# ४४. मी आणि माझा देव

हल्लीच ह्या शार्षकाचे एक पुस्तक वाचनात आले. ब-याच नामवंतांची देवाबद्दलची मते संकलीत केली होती. मनात सहज विचार आला की आपणही ह्या विषयावर का लिहू नये ?

मी काही पेशाने लेखक नव्हे. त्यामुळे ह्या विषयावर किती मुद्देसुद लिहता येईल अशी शंका मनात उपस्थित झाली. पण मग विचार केला की माझ्या आयुष्याचा प्रवास व त्यावेळोवेळी आठवलेला देव असे क्रमाने लिहत जावे. कदाचित त्यातूनच विषय उलगडला जाईल.

प्रथम ह्या शार्षकाचा परामर्श घेतो . देव हा शब्द जरी सगळयांच्या परिचयाचा असला तरी माझा देव हा शब्द प्रत्येकाच्या मनातील देवाच्या कल्पनेला आवाहन करतो.

माझा जन्म एका खाऊन पिऊन सुखी अशा मोठया कुटूंबात झाला. मला जन्मवेळीच साडेसाती होती. त्याचवेळी माझे वडिल आजारी पडले होते. त्यांच्या मुळावर आलेला अशी माझी ओळख होती. खरे तर  माझ्या जन्माला माझे आई वडिल जबाबदार होते. जन्म कधी घ्यायचा हे ही माझ्या हातात नव्हते. माझा जन्म व त्यांचे आजारपण ह्यांचा संबंध कसा ? असे बरेच प्रश्न नाचवित मी लहानाचा मोठा झालो.

माझे वडिल देवभक्त नव्हते. देवाला नमस्कार करीत पण कर्मकांड फारशी नाहीत. नाही म्हणायाला दर वर्षी श्रावण महिन्यात सत्यनारायणाची पूजा असे. तसेच वडिल शनिवारचा उपास करीत. वडिलांची रास मकर. राशीस्वामी शनि. वडिलांचे आयुष्य खूपच कष्टमय गेले. त्यावर कदचित उतारा म्हणून ते शनिवारचा उपास करीत असावेत. मारूतीला सुद्धा जात असावेत. कारण कपाळाला कधीतरी शेंदूर दिसे. वडिलांचा कर्मावर विश्र्वास फार. माणसांशी संवाद साधण्यावर त्यांचा फार भर.

त्यामानाने आई ब-यापैकी देवभक्त होती. पुजाअर्चा मन लावून करत असे. कसलीतरी स्त्रोत्र , गीता वगैरे वाचीत असे. जपजाप्य करी. चारचौघांसारखे जाता येता उपासतापास करी. परंतू ऐवढे सगळे करूनही मी तीला कधी निर्भय बघितली नाही. कारण ह्या देवभक्तीचा प्रत्यक्ष संबंध माझ्या वडिलांच्या ढासळत्या तब्बेतीशी होता.

माझी आजी देवभक्त होती. आजोळी मी रामरक्षा शिकलो. फार नियमीतपणे म्हटल्याचे मात्र आठवत नाही. लहानपणी श्रावण महिन्यात आईने केलेली जिवतीची पूजा, पाटावर गंधाने काढलेल्या नागाची पूजा वगैरे आठवते. संध्याकाळी ७ वाजता आई निरांजन लावायची. आम्ही सर्व भावंडे रामरक्षा , शुंभकरोती वगैरे म्हणत असू. परंतु आई प्रमाणेच ह्या सर्वांचा संबंध आपल्या वडिलांचे आयुष्य वाढावे व त्यांचा सहवास जास्त वर्षे मिळावा ह्या गोष्टीशीच होता.

आईच्या बोलण्यात ह्याचा वारंवार उल्लेख असे. मला वाटते कि देवावरच्या प्रेमापेक्षा दादांवरील प्रेमापोटी मी देवाला हात जोडत असे. अर्थात दर शुक्रवारी आईने केलेल्या पुरणाचाही थोडाफार संबंध होता असे म्हटले तर चूक होणार नाही. लहानपणी आम्ही सर्व भाऊ दिवाळी, दस-याला देवळात जात असू.

ह्या सर्व आठवणी १० वर्षापर्यंतच्या आहेत. पुढे थोडा मोठा झाल्यानंतर एका वेगळयाच वळणावर माझे आयुष्य थडकले व प्रथम देवाबरोबर झगडा सुरू झाला. अशीच काही वर्षे गेली. एकदा तर मन खूपच उद्विग्न झाले. मला देवाचा खूप राग आला होता. मी व आई आम्ही दोघेच घरी होतो. आईचा भित्रेपणा आणखिन वाढला होता. मी प्रचंड संतापलो होतो. त्याचवेळी आईने शांतपणे एक प्रश्न विचारला की जर तुझा देवावर एवढा राग आहे तर देव्हा-यातील देव स्वतःच्या हाताने टाकून दे. अर्थातच मी हे करू शकलो नाही. माझा राग शांत झाला व मी एका वेगळयाच सत्याला सामोरा गेलो. देवाच्या बदली मी माझ्या नशिबाला दोष देऊ लागलो. त्याचवेळी बालवयात एक सिद्धांत समोर आला. आयुष्यातील अडचणी , दुःखे आपण टाळू शकत नाही. तो आपल्या पूर्वसुकृताचा भाग असतो. आपल्यासमोर एकच मार्ग शिल्लक असतो व तो म्हणजे अडचणीचा मनापासून स्वीकार व आपली अडचण कशी नगण्य आहे हे बाहेरील जगाचे निरीक्षण करून मनाला पटवायचे. असो.

काही वर्षे गेली. मनाने उच्चशिक्षणाची कास धरली. एकच ध्यास की मी असे उच्च शिक्षण घेईन की लोकांना माझा हेवा वाटला पाहिजे. अर्थात ह्या ध्येयासाठी मला माझ्या चुलतबहिणीचे व मोठया भावाचे आभारच मानावे लागतील. ब-यापैकी हुशार असलेला मी त्यांच्यामते ‘ढ’ होतो. हा ‘ढ’ पणाच मला नाहिसा करायचा होता. मला अशा ठिकाणी पोचायचे होते की मी ‘ढ’ आहे हे म्हणताना लोकाना १० वेळा विचार करावा लागेल.

ह्या ध्येयपूर्तीमुळेच मी माझ्या व्यक्तीगत जीवनातील अडचणींचा सामना करू शकलो. ह्या ध्येयपूर्तीच्या मार्गक्रमणेत मी परत देवभक्तीकडे ओढला गेलो. मी संकष्टीचतुर्थीचा उपवास करू लागलो. अर्थात साबुदाण्याच्या खिचडीचे आकर्षण होतेच. गणपतिअर्थवशीर्ष वाचू लागलो. शिक्षणाचा एक टप्पा पार केल्यानंतर अखंडपणे १२१ वेळा अर्थवशीर्ष गणपतीवर अभिषेक करताना म्हणू लागलो. ४ तासांचा अवधी लागे. नारळाचे तोरण गणपतीला अर्पण करू लागलो. गणपतीला फुलांची वाडी भरू लागलो. पण फरक फक्त प्रार्थनेत होता. शिक्षणात यश दिल्याबद्दल देवाचे आभार हा पहिला अंक असायचा. तर दुसरा अंक दबावतंत्राचा असायचा. मला आयुष्यात किती भोगायला लागले व त्यामुळेच माझ्या ध्येयपूर्तीसाठी तुझे आशीर्वाद मिळणे कसे गरजेचेच आहे वगैरे. माझा कोणत्याही परिस्थित शिक्षणात पराभव होता कामा नये.

मला कल्पना नाही कि ह्या देवाबरोबरच्या भांडणामुळे कि मी केलेल्या प्रयत्नांमुळे, मी उच्च शिक्षणा-या पाय-या सहजगत्या पार केल्या. मनात ठरविले होते त्याप्रमाणेच उच्च शिक्षण पूर्ण केले. लोकांच्या कुतूहलाच मी विषय झालो. माझ्या मनाला थोडीफार शांतता मिळाली.

हे उच्चशिक्षण घेताना नोकरीत उच्च पदावर कामही करत होतो. नोकरीतही अडचणी, कटकटी होत्याच.
परंतु हे देवभक्तीचे भूत परत एकदा मानेवरून उतरले. पुढे संसारात गुंतलो. प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यात सत्यनारायण करण्याचा बेत ७ वर्षे पाडला. मग त्यात काही कारणांनी खंड पडला. त्यानंतर १९९६ साली अपघातातून वाचल्यानंतर एकदा सत्यनारायण केला. पण उत्तरपुजा करताना मीच सत्यनारायणाला सांगितले की मी केलेला हा शेवटचा सत्यनारायण. मी परत कधीच सत्यनारायण करणार नाही. चूकून कधी अडचणींच्या प्रसंगी सत्यनारायण करीन असा नवस केला तरी मी तो करणार नाही. खरेतर तूच मला समजून घे व मला सांभाळून घे. आज ह्या गोष्टीला ११ वर्षे झाली.

वयाने व अनुभवाने मन जास्त संवेदनाक्षम होत गेले. पुढे स्वतंत्र व्यवसायामुळे पुष्कळ लोकांशी संबंध आला. त्यांची सुखःदुखे जवळून बघता आली. आपण व इतर लोक ह्यांच्यात नेमका काय फरक आहे हे नको इतके स्पष्ट होत गेले. जीवन सिद्धांत बळकट होत गेले व आयुष्याला त्याचाच मोठा आधार वाटत गेला. आपले विचार हे कसे अल्पमतात आहेत याची जाणीव होत गेली. हया जीवन सिद्धांतचे पालनच कदाचित माझी कर्मकांड असतील.

मी माणसांशी संवाद साधू लागलो. त्यांना धीर देऊ लागलो. प्रोत्साहन देऊ लागलो. मला शिक्षणाचा, पदाचा पैशाचा कधीच गर्व झाला नाही. इतरांपेक्षा जास्त शहाणा असे वर्तन मी होऊ दिले नाही. तसेच मी कमीपणाचा **inferiority Complex** चा स्पर्श होऊ दिला नाही. कामावर नितांत श्रद्धा ठेवली. कामालाच देव मानले. आजचे काम आजच संपले पाहिजे असा प्रयत्न केला. तन व मन ओतून काम केले.

माझ्या विमा सर्वे च्या व्यवसायाने खरेतर मला कितीही शत्रु होऊ शकले असते पण मी प्रत्येक वेळी माणसे जोडत गेलो. नुकसान भरपाई का देता येणार नाही हे समजावीत गेलो. झालेली चूक परत होऊ नये म्हणून काय खबरदारी घेतली पाहिजे हे ही सांगत गेलो.

तोच प्रकार **Audit** करताना. कर्मचा-यांच्या अडीअडचणी, त्यांचे शिक्षण , अनुभव लक्षात घेऊन त्यांच्या पातळीवर येऊन त्यांच्याशी संवाद साधला. प्रत्येकाकडून शिकत गेलो. संवाद साधताना मी शहाणा व तू मुर्ख अशी वर्गवारी कधीच केली नाही.

पुढे ज्योतिषशास्त्र शिकलो व माझ्या कुवतीनुसार लोकांना मार्गदर्शन करायचा प्रामाणिक प्रयत्न केला. पुढे हा उपक्रम बंद केला.
त्यानंतर वैद्दकशास्त्राचा थोडा फार अभ्यास केला. त्याचा उपयोग कुटूंबाचे व इतर लोकांचे आरोग्य चांगले राहील ह्यासाठी करत आहे.

लोकांचे प्रश्न समजून घेऊन आपल्या अनुभवावरून व्यावहारीक सल्ला देऊ लागलो .
समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी अल्पप्रमाणात देणग्या देत गेलो . गरजु लोकांना पैशाची मदत केली .
कर्मकांडावर विश्वास कधीच नव्हता . किंबहूना एवढे सर्व कर्मकांड करून लोकांना काय मिळते ह्याचा उलगडा होत नाही . कर्मकांडापायी व्यर्थ घालवलेला वेळ व श्रम मनात संतापाची भावना निर्माण करतो .

आपल्या आयुष्याचे आपणच शिल्पकार असतो . आपल्या हातात फक्त प्रयत्न करणे एवढेच आहे . हे प्रयत्न मनापासूनचे पाहिजेत . प्रर्यत्न एवढे पाहिजेत की नशीबाला हेवा वाटेल व ते नशीबच यश देण्यासाठी पुढे सरसावेल .

आजही सौ . गावाला गेली असेल तर मी यांत्रिकपणे पूजा करतो . चूकून विसरलो तरी मनाला बैचैनी येत नाही . पण मनात फक्त एकच विचार असतो की जर आपण दिवसातील प्रत्येक गोष्टींसाठी वेळ काढणार ( जेवण ,झोप ,घराची सफाई ,ऑफीसचे काम वगैरे ) तर मग पुजेसाठी ५ मिनीटे का काढायची नाहीत ?

आमच्या इमारतीसमोरच गणपतीचे देऊळ आहे . सकाळी बाहेर पडताना प्रथम गणपतीला नमस्कार करूनच पुढे जातो . पण देवळात जायचा कोणताही नेम नाही . कदाचित हा नमस्कार आता माझ्या शरीराच्या इतर प्रतिक्षिप्त क्रियेतच मोडतो . हिंदूधर्मातील ३३ कोटी देवांची संकल्पना मला बुचकळयात पाडते . मला मात्र देव म्हणजे नेहमी गणपतीच आठवतो . प्रत्येक धर्माप्रमाणे देवाचे स्वरूप , कर्मकांड , नाव वगैरे बदलते . प्रत्येक धर्माला आपलाच देव श्रेष्ठ वाटतो .
मलातर देवळातील गडबड, गोंधळ, पुजा-यांची मनमानी, प्रचंड रांगा यांचा तिटकारा आहे . लहानपणी मी पाद्रांच्या शाळेत होतो . चर्चचे शांत वातावरण मला भुरळ घाली . मोठेपणी मी अर्थात धर्म बदलला नाही . पण आजही प्रवास सुरू करताना **Christian** लोकांप्रमाणे नमस्कार करतो .कदाचित एका हाताने नमस्कार किंवा येशूला अभिवादन करता येत असेल .

माझ्यासाठी माझे काम , माणसांशी संवाद हीच देवपूजा आहे . मला १९९६ साली अपघात झाला . बस चेंडूसारखी पडली . मी बेशुद्ध झालो . शुद्धीत येऊन मी चालताना पाहिला विचार आला की माझी सर्व कामे , **Survey** , **Audit** पुर्ण केलेली आहेत . मला बरे होण्यास एक महिना लागला तरी माझे काम व पर्यायाने माझ्या **Client** चे नुकसान होणार नाही .

आजही झोपेतून रात्री कधी जाग आली तर प्रथम वार आठवतो व आज मी काय काम कारायचे योजले आहे हे आठवते . मला कल्पना आहे कि हे वाचताना तुम्हाला विचित्र वाटेल पण माझ्या मनातील ही भावना मी मोकळेपणी सांगत आहे .

एवढया वर्षातील वाटचालीत मी पूर्ण आस्तिक किंवा पूर्ण नास्तिकही झालो नाही. परंतु तरूणपणी कोणत्याही कारणांनी केलेली कर्मकांडे , उपास बंद झाले आहेत.

आज निवृत्तीच्या उंबरठयावर उभा असताना माझे आयुष्य म्हणजे कामावरील श्रद्धा , शिक्षणाचा ध्यास , नवनवीन छंद , निवृत्तीनंतर वेळ कसा सार्थकी लावता येईल याचा विचार , तरूणपीढीबद्दल काळजी असे काहीसे झाले आहे.

काय मित्रांनो , तुमची देवाबद्दलची मते मला कळवाल ? वाट बघतोय.